CMYK

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा जागतिक कृषी पुरस्काराने गौरव >> पान 2

चांदवडच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवीच्या रंगमहालचे दुरुस्तीचे काम मंद गतीने >> पान 3

डोणगाव येथील पोलिसाच्या त्रासाला कंटाळून युवकाचा आत्महत्या करण्याचा प्रयत्न >> पान 4


# दैनिक आपला विदर्भ



**सुविचार**

आयुष्यात असं काहीतरी मिळवा
जे तुमच्या पासून कुणीही चोरून घेऊ शकत नाही.

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

ही व्यक्ती बनवणार महेश बाबूचा १००० कोटींचा चित्रपट भव्य! हृतिक रोशनच्या चित्रपटाचा होता एक भाग
आतील पान



■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 43 ■ गुरूवार, दि. 19 सप्टेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# ‘एक देश, एक निवडणूक’ संकल्पनेला मंत्रिमंडळाची मंजुरी

## हिवाळी अधिवेशनात विधेयक मांडणार?

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था** : एक देश, एक निवडणूक ही संकल्पना राबविण्याला केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. हिवाळी अधिवेशनात हे विधेयक मांडले जाणार असल्याची माहिती मिळत आहे.

भारताचे माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखालील तज्ज्ञ समितीने एक देश, एक निवडणूक हा कार्यक्रम राबविण्यासंदर्भातला अहवाल मार्च २०२४ रोजी केंद्राला सोपविला होता. त्यानंतर आज केंद्रीय मंत्रिमंडळाने या अहवालावर शिक्कामोर्तब केले असून या संकल्पनेला मान्यता दिली असल्याची माहिती मिळत आहे. दी इंडियन एक्सप्रेसने याबाबतची बातमी दिली आहे. पंतप्रधान मोदी यांच्या तिसऱ्या




कार्यकाळाला १०० दिवस पूर्ण झाल्यानंतर मंत्रिमंडळाने हा निर्णय घेतला असल्याचे सांगितले जाते.

आता हिवाळी अधिवेशनात याबाबतचे विधेयक सादर केले जाणार असल्याची माहिती मिळत आहे.

पंतप्रधान मोदी यांचा दुसरा कार्यकाळ संपत असताना २ सप्टेंबर २०२३ रोजी कोविंद समिती नेमण्यात आली होती. तिने या विषयावर १९१ दिवस काम केले आणि १४ मार्च २०२४ रोजी १८,६२६ पानांचा अहवाल सादर केला. या समितीच्या सदस्यांमध्ये वेगवेगळी पार्श्वभूमी असलेल्या वेगवेगळ्या प्रतिष्ठित व्यक्ती होत्या. राजकीय पक्ष, निवृत्त सरन्यायाधीश, माजी मुख्य निवडणूक आयुक्त आणि राज्य निवडणूक आयुक्त, कायदेतज्ज्ञ अशा सगळ्यांकडून या समितीने सूचना मागवल्या. जनतेकडूनही सूचना मागविण्यात आल्या होत्या. बार कौन्सिल ऑफ इंडिया, कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री, फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री अशा सगळ्यांना त्यांचे मत मांडण्याची संधी देण्यात आली.

गेल्या काही दिवसांपासून पुन्हा एकदा एक देश, एक निवडणूक ही चर्चा सुरू आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्य दिनाच्या निमित्त लाल किल्ल्यावरून भाषण करताना याच संकल्पनेचा पुन्हा उल्लेख केला होता.

### कोविंद समितीने काय सुचविले?

कोविंद समितीने देशात एकाच वेळी निवडणुका व्हाव्यात, असे एकमुखी मत देऊन त्यासाठी संविधान आणि संबंधित कायद्यांमध्ये आवश्यक दुरुस्त्या सुचवल्या आहेत. समितीने संविधानात ८२ अ हा एक नवीन अनुच्छेद सुचवला आहे. हा अनुच्छेद असे सांगतो की, ‘‘कलम ८३ आणि १७२ मध्ये काहीही असले तरी, नियुक्त तारखेनंतर होणाऱ्या कोणत्याही सार्वत्रिक निवडणुकीआधी स्थापन झालेल्या सर्व विधानसभांची पूर्ण मुदत संपुष्टात येईल’’. समितीने स्पष्ट केले की ‘सर्व देशभर एकाचवेळी निवडणुका’ यात पंचायत निवडणुका वगळून – लोकसभा आणि सर्व विधानसभेच्या एकत्रित निवडणुकांचा समावेश असेल. पंचायतीसाठी, लोकसभेनंतर ‘शंभर दिवसां’त निवडणुकांचा प्रस्ताव आहे.

अहवालात असेही म्हटले आहे की, ‘‘जेथे कोणत्याही राज्याची विधानसभा अविश्र्वास प्रस्ताव, त्रिशंकू सदन किंवा इतर कोणत्याही कारणामुळे बरखास्त झालेली असेल, अशा सभागृहासाठी त्यांचा कार्यकाळ लोकसभेबरोबरच संपेल या बेताने नव्याने निवडणुका घेतल्या जातील.’

---

# आधी महापालिका निवडणुका घ्या

## भाजपच्या ‘एक देश एक निवडणुकी’वर राज ठाकरेंचा टोला

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी** : केंद्रीय मंत्रिमंडळाने देशात ’वन नेशन वन इलेक्शन’ला मंजुरी दिल्यानंतर आता विरोधकांनी त्यावर टीकेचा भडीमार सुरू केल्याचं दिसतंय. अशात लोकसभेला भाजपला पाठिंबा देणाऱ्या मनसे अध्यक्ष राज ठाकरेंनीही त्यावर चिंता व्यक्त केली आहे. निवडणुकांचं एवढंच महत्व वाटत असेल तर आधी चार वर्षांपासून प्रलंबित असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घ्या असा टोला त्यांनी लगावला. ’एक देश एक निवडणूक’ हे सर्व ठीक आहे, पण एखाद्या राज्यातील सरकार आधीच कोसळलं किंवा लोकसभेसाठी मध्यावधी निवडणुका झाल्या तर काय करणार यावरही खुलासा करावा अशीही मागणी केली आहे.

देशात ’एक देश एक निवडणूक’ पद्धतीला केंद्रीय मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. त्यावर प्रतिक्रिया देताना मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी सोशल मीडियावर एक



पोस्ट शेअर केली आहे. ’एक देश एक निवडणूक’ धोरणावर आधी संसदेची मान्यता लागेल, नंतर प्रत्येक राज्याचा कौल विचारात घ्यावा लागेल. त्यावेळी राज्यांच्या स्वायत्ततेल धक्का लागणार नाही याची काळजी घ्यावी असं राज ठाकरे म्हणाले.

आधी महापालिका निवडणुका घ्या

सरकारला निवडणुकांचं इतकं महत्व वाटतंय तर आधी चार वर्षांपासून प्रलिंबित असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घ्याव्यात असा टोला राज ठाकरे यांनी लगावला.

काय म्हणाले राज ठाकरे?

’एक देश एक निवडणूक’ संकल्पनेला >> पान २

---

## राज्यात पाऊस पुन्हा ॲक्टीव मोडवर, पुढील ४८ तासांनंतर या जिल्ह्यांना धुंवाधार पावसाचा इशारा

**मुंबई/प्रतिनिधी** : राज्यात काही काळाचा ब्रेक घेतल्यानंतर पाऊस पुन्हा एकदा ॲक्टीव्ह मोडवर येणार आहे. भारतीय हवामान विभागानं शनिवारपासून पुन्हा धुंवाधार पावसाचा इशारा दिला असून मध्य महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाड्यातील काही जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे.

हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार, सध्या कमी दाबाचा पट्टा झारखंड आणि त्याला जोडून उत्तर छत्तीसगडच्या भागात सक्रीय आहे. त्यामुळे येत्या दोन दिवसात विदर्भात जोरदार पावसाची शक्यता आहे. त्यानंतर पावसाचा जोर काहीसा मध्य महाराष्ट्रातील काही जिल्ह्यात व मराठवाड्यातही दिसून येईल.

पुढील दोन दिवस हलक्या पावसाचे

हवामान विभागानं दिलेल्या अंदाजानुसार १८ व १९ सप्टेंबर रोजी राज्यात मराठवाड्यासह खान्देशात हलक्या सरींच्या पावसाची शक्यता आहे. तर गुरुवारी पावसाचा जोर मध्य महाराष्ट्रासह मुंबई, ठाणे, रायगडसह मराठवाड्यातही राहण्याची शक्यता आहे. >> पान २

---

# २०३० पर्यंत भारतीय अर्थव्यवस्थेचा आकार सहज दुप्पट; नीती आयोगाचा अंदाज

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी** : भारत २०३० पर्यंत अर्थव्यवस्थेचा आकार सहज दुप्पट होऊ शकतो. हवामान बदलाकरिता तंत्रज्ञानात अग्रेसर होण्याची संधीसुध्दा भारताला आहे, असे प्रतिपादन नीती आयोगाचे मुख्य कार्यकारी अधिकारी(सीईओ) बी. व्ही. आर सुब्रमण्यन यांनी केले. पब्लिक अफेअर्स फोरम ऑफ इंडिया तर्फे आयोजित कार्यक्रमात बोलत ते होते.

भारतीय अर्थव्यवस्था




आगामी २०३० पर्यंत सहज दुप्पट होईल. २०२६–२७ पर्यंत तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था होण्यासाठी एक सुसंगत सर्वसमावेशक धोरण आवश्यक आहे, असे सांगताना सुब्रमण्यन म्हणाले भारत हा जागतिक अर्थव्यवस्थेतील एक अतिशय प्रभावशाली खेळाडू असेल. त्याचे आधीच खूप महत्त्व असून २०४७ पर्यंत जागतिक घडामोडींमध्ये त्याचे महत्त्व आणखी वाढेल, असा विश्र्वास त्यांनी व्यक्त केला.

सुब्रह्मण्यम म्हणाले, २०४७ पर्यंत भारत लोकसंख्येच्या दृष्टीने जगातील सर्वात तरुण देशांपैकी एक असेल. अंदाजे दरडोई उत्पन्न १८ ते २० हजार युएस डॉलर असेल. ही वाढ लक्षणीय आहे कारण गेल्या दशकात नैसर्गिक आपत्ती आणि गरिबी यांसारख्या आव्हानांना तोंड देण्यासाठी भारताने एक प्रमुख जागतिक नेतृत्व म्हणून उदयास येण्याची अपेक्षा केली आहे, असेही सुब्रमण्यन यांनी सांगितले.

हरित अर्थव्यवस्थेवर लक्ष केंद्रित करण्याची गरज असून आम्ही एक टास्क फोर्स तयार केला आहे. नीती आयोग २०७० पर्यंत निव्वळ शून्य कार्बन उत्सर्जनाचा मार्ग विकसित करण्यावर काम करत आहे. आमचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारांसोबत काम करत आहोत, असेही सीईओ बी व्ही आर सुब्रमण्यन यांनी यावेळी स्पष्ट केले.

---

# देवेंद्र फडणवीस हेच मुख्यमंत्री होतील! महंत विठ्ठल महाराजांचं भाकित

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी** : राज्यात पुन्हा देवेंद्र फडणवीस हेच मुख्यमंत्री होतील असं भाकित बीड गहिनीनाथ गडाचे महंत विठ्ठल महाराज यांनी केलं आहे. तसेच देवेंद्र फडणवीस हेच संपूर्ण महाराष्ट्रातील समाजाचे कैवारी असल्याचेही ते म्हणाले. बीडमध्ये आयोजित एका कीर्तनात त्यांनी हे वक्तव्य केलं आहे.

देवेंद्र फडणवीस हे देव, धर्म आणि देश या सर्वांचे एकच महाराष्ट्राचे कैवारी आहेत. देवेंद्र फडणवीस हेच



पुन्हा मुख्यमंत्री होतील, असे वक्तव्य महंत विठ्ठल महाराज यांनी केले आहे. दरम्यान, आगामी विधानसभा



निवडणूकीच्या तोंडावर महंत विठ्ठल महाराजांनी केलेल्या वक्तव्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

---




---

## बांगलादेशात हिंदूंवर आणखी मोठे संकट! आर्मीला दिले नागरिकांना वॉरंटविना अटक करण्याची परवानगी

**ढाका/वृत्तसंस्था** : बांगलादेशातील हिंदूवर आणखी एक संकट ओढावले आहे. बांगलादेश सरकारने जारी केलेल्या सूचनेत मंगळवारी १७ सप्टेंबर रोजी एक माहिती जाहीर केली होती. सैन्य अधिकारी देशभरात दंडाधिकारी म्हणून काम करतील. पुढील ६० दिवसांसाठी दिलेल्या अधिकाराचा वापर करतील असे पारिपत्रात नमूद केले गेले. अर्थातच बांगलादेशी लष्करांना विनावॉरंट अटक करण्याची परवानगी बांगलादेशी सरकारने दिली.

बांगलादेशात आता नागरिकांना वॉरंटविना अटक करण्याची परवानगीलष्करांना देण्यात आली आहे. यामुळे बांगलादेशात असलेल्या हिंदूंच्या सुरक्षेत वाढ होऊ लागली आहे. शेख हसीनांच्या सरकारनंतर बांगलादेशातील अंतरिम सरकारने बांगलादेशातील लष्कर हे हिंदूंना कधीही अटक करू शकतात अशी बांलगादेशी हिंदूंना चिंता सतावते. अंतरिम सरकारने सांगितले की, स्व–संरक्षणासाठी किंवा अपत्कालीन वेळी गोळीबार करण्याचा अधिकारलष्करांना देण्यात येईल.

याप्रकरणी बोलताना सर्वोच्च न्यायालयाचे वकील बॅरिस्टर तपश कांती बाऊल म्हणाले की, कार्यकारी दंडाधिकाऱ्यांना उपस्थितीशिवाय अटक करण्याचा अधिकार लष्करांना नव्हता, परंतु आता कोणालाही अटक करण्याचा अधिकार हा लष्करांना आहे.




बुलढाणा शहरात लोकशाही विरुद्ध हुकूमशाही अशा आशयाचा झळकला बॅनर

---

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा बुलढाणा जिल्हा दौऱ्यावर

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलडाणा/प्रतिनिधी** : राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे गुरुवार, दि. १९ रोजी बुलडाणा जिल्हा दौऱ्यावर येणार असून त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे असणार आहे.



मुख्यमंत्री श्री. शिंदे हे गुरुवार, दि. १९, २०२४ रोजी दूपारी १२.२० वाजता एमएसआरटीसी वर्कशॉप मागील हेलीपॅड येथे आगमन व मोटारीने कार्यस्थळी प्रयाण करतील. दुपारी १२.३० वाजता बुलढाणा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकाच्या लोकार्पण सोहळा कार्यक्रमास उपस्थित राहतील. दुपारी १ वाजता राखीव. दुपारी १.१५ वाजता मोटारीने शारदा ज्ञानपीठ हायस्कुल, बुलढाणाकडे प्रयाण करुन दुपारी १.३० वाजता मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियानांतर्गत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा प्रचार व प्रसार कार्यक्रम व इतर महापुरुष व संतांचे पुतळयाचे ई अनावरण कार्यक्रमास उपस्थित राहतील. स्थळ– शारदा ज्ञानपीठ शाळेचे मैदान, बुलढाणा. दुपारी ३.३० वाजता मोटारीने एमएसआरटीसी वर्क शॉप मागील हेलीपॅड बुलढाणाकडे प्रयाण करुन छत्रपती संभाजीनगरकडे प्रयाण करतील.

CMYK

## क्रिकेटच्या नव्या हंगामाची सुरुवात विजयाने करा!

आजपासून म्हणजे १९ सप्टेंबर पासून भारतीय क्रिकेटचा नवा हंगाम सुरू होत आहे. या हंगामाची सुरुवात बांगलादेश सोबत आजपासून सुरू होणाऱ्या कसोटीपासून होत आहे. आजपासून चेन्नई येथील चेपॉक मैदानावर भारत आणि बांगलादेश यांच्यात पहिली कसोटी लढत रंगणार आहे. बांगलादेशचा संघ भारतात दोन कसोटी आणि तीन टी २० सामने खेळणार आहे. या मालिकेकडे केवळ भारताचेच नाही तर क्रिकेट विश्वाचे लक्ष लागले आहे. वास्तविक बांगलादेश याआधी ज्या ज्या वेळी भारत दौऱ्यावर आला त्या त्या वेळी प्रसार माध्यमांनी आणि जागतिक क्रिकेटने त्याची म्हणावी दखल घेतली नाही त्याला कारणही तसेच होते कारण भारत आणि बांगलादेश या दोन्ही देशात भारतच नेहमी वरचढ राहिला आहे. बांगलादेशने भारता विरुद्ध आजवर एकही कसोटी जिंकली नाही त्यामुळे बांगलादेश संघाला ना भारतीय प्रेक्षक जमेस धरत होते ना प्रसार माध्यमे मग यावेळेसच प्रसार माध्यमांचे आणि क्रिकेटप्रेमिंचे या दौऱ्याकडे लक्ष का ? तर त्याचे उत्तर शोधण्यासाठी आपल्याला काही दिवस मागे जावे लागेल. काही दिवसांपूर्वी बांगलादेशचा संघ पाकिस्तान दौऱ्यावर गेला होता. या दौऱ्याकडे देखील प्रसार माध्यमांनी दुर्लक्षच केले होते कारण सर्वांना वाटले होते की पाकिस्तान बांगलादेशला सहज नमवेल कारण पाकिस्तान संघ हा बांगलादेश पेक्षा बलवान संघ होता मात्र प्रत्यक्ष घडले उलटेच. पाकिस्तानने बांगलादेशची शिकार करण्याऐवजी बांगलादेशनेच पाकिस्तानची शिकार केली. बांगलादेशने पाकिस्तानला सलग दोन कसोटीत नमवून सर्वांना आश्चर्याचा धक्का दिला. बांगलादेश अशी ऐतिहासिक कामगिरी करेल अशी अपेक्षा कोणालाच नव्हती मात्र त्यांनी ती कामगिरी केली. पाकिस्तानला नमवणाऱ्या बांगलादेश संघात जे खेळाडू होते तेच खेळाडू भारत दौऱ्यावर आले आहेत म्हणूनच या संघाने पाकिस्तानात जी कामगिरी केली त्याची पुनरावृत्ती ते भारतात करतील का ? हे पाहण्यासाठी संपूर्ण क्रिकेट विश्वाचे लक्ष या मालिकेकडे लागले आहे. पाकिस्तानला पाकिस्तानात जाऊन पाणी पाजल्यावर बांगलादेश संघाचे मनोबल ही खूप वाढले आहे. बांगलादेशच्या कर्णधाराने थेट भारताला पराभूत करण्याची भाषा केली आहे अर्थात बांगलादेशने कितीही फुशारक्या मारल्या तरी बांगलादेश भारताला पराभूत करू शकत नाही कारण भारत म्हणजे पाकिस्तान नाही. भारताचा संघ हा क्रिकेट विश्वातील सर्वात बलवान संघ आहे. भारताची फलंदाजी जगातील सर्वात बलवान फलंदाजी आहे तर गोलंदाजी जगातील सर्वात घातक गोलंदाजी आहे. रोहित शर्मा, यशस्वी जयस्वाल, शुभमन गील, विराट कोहली, के एल राहुल, ऋषभ पंत ही फलंदाजांची लाईन अप पाहिली तरी धडकी भरते. जगातील सध्याचा सर्वात घातक वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमरा आणि मोहंमद सिराज ही वेगवान जोडगोळी भारताला सुरुवातीलाच बळी मिळवून देतात तर आश्विन, जडेजा आणि अक्षर पटेल ही फिरकी तिकडी प्रतिस्पर्धी संघाला लोटांगण घालायला लावण्यास पुरेशी आहे शिवाय कुलदीप यादव हा देखील आपल्याकडे आहे त्यामुळे भारत ही मालिका २ – ० ने सहज जिंकेल आणि ती तशी जिंकायलाही हवी कारण ही मालिका भारताला विश्व टेस्ट चॅम्पियनशिपच्या (WTC) फायनल मध्ये पोहचवण्यासाठी खूप महत्वाची आहे. भारताने जर बांगलादेशला क्लीन स्वीप दिला तर भारताचे पॉइंट वाढतील त्याचा भारताला मोठा फायदा होईल. शिवाय भारताला विजयाची लय सापडेल कारण या मालिके नंतर भारताला इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया यासारख्या तगड्या संघाविरुद्ध खेळायचे आहे. जर भारताला विजयी लय सापडली तर त्याचा फायदा इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया संघाविरुद्ध होऊ शकतो. म्हणूनच भारतासाठी ही महत्वाची मालिका आहे. भारतीय खेळाडूंना देखील हे चांगले माहीत आहे म्हणूनच भारतीय संघातील खेळाडू ही मालिका २ – ० ने जिंकण्यासाठी जीवाचे रान करतील यात शंका नाही. क्रिकेटच्या नव्या हंगामाची सुरुवात विजयाने करण्यासाठी भारतीय संघाला मनापासून शुभेच्छा!




# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा जागतिक कृषी पुरस्काराने गौरव

## महाराष्ट्राच्या शाश्वत शेती प्रयत्नांचा जगाकडून गौरव –राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन

## महाराष्ट्राला शेती क्षेत्रात पहिल्या क्रमांकाचे राज्य बनवणार – मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** जागतिक कृषी पुरस्कारामुळे महाराष्ट्राच्या शाश्वत शेतीच्या प्रयत्नांवर जगाने मोहोर उमटवली आहे. महाराष्ट्राने नेहमीचे भारतातील कृषी क्षेत्रात प्रयोगशीलता राबवल्याचे या पुरस्कारामुळे सिद्ध झाले, अशा शब्दांत राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना प्रदान करण्यात आलेल्या जागतिक कृषी पुरस्कारांबद्दल कौतुकोद्गार काढले आहेत.





पर्यावरण रक्षण, शाश्वत विकास आणि हरित महाराष्ट्रासाठी मुख्यमंत्री शिंदे यांच्या कामाची दखल घेऊन 'वर्ल्ड ग्रीकल्चर फोरम'कडून त्यांना जागतिक कृषी पुरस्काराने आज सन्मानित करण्यात आले. फोरमचा हा दुसराच पुरस्कार असून हा पुरस्कार राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते मुख्यमंत्री श्री शिंदे यांना प्रदान करण्यात आला. जागतिक बांबू दिनाच्या औचित्याने या समारंभाचे आयोजन करण्यात आले. एनसीपीएच्या सभागृहात झालेल्या या समारंभास महाराष्ट्र कृषी मुल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, 'वर्ल्ड एग्रीकल्चर फोरम'चे अध्यक्ष डॉ. रुडी रॅबिंगे, फोरमचे आशिया प्रांताचे उपाध्यक्ष डॉ. विलियम्स दार, आफ्रिका प्रांताचे उपाध्यक्ष प्रो. लिंदवे सिंबादा, अमेरिका प्रांताचे उपाध्यक्ष डॉ. केनिथ क्वीन्, फोरमचे भारतातील संचालक तथा इंडियन चेंबर ऑफ फूड ग्रीकल्चरचे अध्यक्ष डॉ एमजे खान, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे उपस्थित होते.

वर्ल्ड ग्रीकल्चर फोरमचा जागतिक कृषी पुरस्कार हा महाराष्ट्रातील राबणाऱ्या शेतकऱ्यांना अर्पण करत असल्याचे नमूद करून महाराष्ट्राला शेतीच्या क्षेत्रातही पहिल्या क्रमांकाचे राज्य बनविण्यासाठी प्रयत्नशील असल्याची ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

राज्यपाल म्हणाले की, राज्यातल्या कृषी विद्यापीठांमध्ये कृषी क्षेत्राशी संबधीत नवनवीन तंत्रज्ञानाविषयी संशोधन करण्यात येत आहे. या नवनवीन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या जीवनात आनंद आणि आर्थिक सुबत्ता निर्माण करत असल्याचा सार्थ अभिमान आहे. मुख्यमंत्री यांना मिळालेला पुरस्कार महाराष्ट्राच्या शेती क्षेत्रातील यशाचे आणि शाश्वत शेतीतील प्रयोग आणि प्रयत्नांचे जागतिक पटलावर प्रतिबिंबित करणारा आहे. हा पुरस्कार केवळ मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या दूरदर्शी नेतृत्वाचेच नव्हे, तर महाराष्ट्राच्या कृषी नवकल्पना आणि पर्यावरणीय शाश्वततेमध्ये केलेल्या जागतिक पातळीवरील योगदानाचा सन्मान आहे. महाराष्ट्राने भारताच्या कृषी क्षेत्रात एक महत्त्वपूर्ण स्थान आबाधित राखले आहे. आपले शेतकरी, आपल्या अन्नसुरक्षेत महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असून त्यांच्या जिद्दी आणि कष्टांनी देशाचा कणा बनले आहेत.

यावेळी राज्यपाल म्हणाले की, दुष्काळ, पाण्याची कमतरता, पूर आणि हवामान बदल यांसारख्या असंख्य आव्हानांनंतरही, महाराष्ट्राने आपली ताकद आणि अनुकूलता दाखवली आहे. आम्ही शेतकऱ्यांना प्रगत बियाणे, खत आणि आधुनिक शेती साधनांनी सुसज्ज केले आहे, तसेच सूक्ष्म सिंचन यांसारख्या नाविन्यपूर्ण पद्धतींचे प्रशिक्षण दिले आहे. कृषी विद्यापीठांशी असलेल्या सहकार्यामुळे अत्याधुनिक संशोधनाचे प्रत्यक्ष वापरामध्ये रूपांतर होऊन उत्पन्न वाढले आहे.

मुख्यमंत्री श्री शिंदे म्हणाले की, आजच्या पर्यावरण बदल आणि तापमान वाढीचा काळात पर्यावरण संरक्षण आणि कृषी यांचे संतुलन राखणे ही काळाची गरज आहे.राज्यातील शेतकऱ्यांच्या वतीने आजचा हा पुरस्कार स्वीकारतो आणि राज्यातील सर्व शेतकऱ्यांना हा पुरस्कार समर्पित करतो. आजच्या काळात अन्न सुरक्षा महत्वाची आहे. लोकांचे पोट भरण्याचे महत्वाचे काम शेतकरी करतो. त्यामुळे त्याला अन्नदाता म्हणतात. शेतकरी आणि शेती महत्वाची आहे. वातावरण बदल आणि तापमान वाढीचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांना बसतो. त्यामुळेच तापमानवाढ कमी करणे ही गरज असून त्यासाठी राज्य शासनाने पर्यावरण कृती समितीची स्थापना केली आहे. राज्यात २१ लाख हेक्टर बांबू लागवडीचे उद्दिष्ट ठेवले आहे. पूर, अतिवृष्टी, दुष्काळ या सारथ्य नैसर्गिक संकटाना शेतकऱ्यांना तोंड द्यावे लागते. शेतकरी हा नवीन बदलांनाही स्वीकारत आहे. शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीर पणे उभे आहे. शेतीचा विकास आणि शेतकऱ्यांना आर्थिक बळ देण्यासाठी अनेक कल्याणकारी योजना राबवल्या जात आहेत. सिंचनाच्या १२५ प्रकलपणा मंजुरी देण्यात आली असून शेतकऱ्यांच्या जीवनात आनंद निर्माण करणे हे शासनाचे उद्दिष्ट असल्याचे मुख्यंमत्र्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, महाराष्ट्र हे देशाच्या विकासाचे ग्रोथ इंजिन आहे. देशाच्या जीडीपीमध्ये राज्याचा मोठा वाटा आहे. रोजगार, थेट परकीय गुंतवणूक, विकास यामध्ये राज्य देशात आघाडीवर आहे. कृषी विकासातही राज्य आघाडीवर आहे. शेतकऱ्यांसाठी अनेक कल्याणकारी योजना राबवण्यात येत आहे. १ रुपयात पीक विमा देणारे 'महाराष्ट्र' हे देशातील पहिले राज्य आहे. नमो शेतकरी सन्मान योजनेत केंद्र शासनाच्या ६ हजार रुपयांव्यतिरिक्त राज्य शासन ६ हजार रुपये देते, असे शेतकऱ्यांना वर्षाला १२ हजार रुपये मिळत आहेत. येत्या दोन वर्षात ५ लाख सौर कृषी पंप देण्याचे उद्दीष्ट आहे. तसेच १७ लाख हेक्टर जमीन सिंचनाखाली आणण्याचे उद्दीष्ट आहे. शेतीला चोवीस तास विद्युत पुरवठ्यासाठी प्रयत्नशील आहोत. शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्तीमध्ये देण्यात येणाऱ्या मदतीमध्ये भरघोस वाढ करण्यात आली आहे. एनडीआरएफच्या निकषांच्या दुप्पट मदत केली जाते. २ हेक्टरची मर्यादा ३ हेक्टर करण्यात आली आहे. देशाची आर्थव्यवस्था ५ ट्रिलीयन करण्याचे ध्येय प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी ठेवले असून यामध्ये महाराष्ट्र १ ट्रिलीयन अर्थव्यवस्था निर्माण करून भरीव योगदान देईल. पर्यावरण संरक्षण, विकास आणि कृषीचा शाश्वत विकास यासाठी सर्वांच्या सहयोगाची गरज आहे. यात उद्योग आणि अन्य क्षेत्रांबरोबरच शेती आणि शेतकऱ्यांचेही महत्वपूर्ण योगदान राहीले.

वर्ल्ड ग्रिकल्चर फोरमचे उपाध्यक्ष विल्यम दार यांनी प्रस्तावनेमध्ये पुरस्काराचे स्वरूप आणि निवड पद्धती याविषयी माहिती दिली. आभार प्रदर्शन जागतीक कृषी परिषदेचे राष्ट्रीय संचालक एम.जे.खान यांनी व्यक्त केले.

# ही व्यक्ती बनवणार महेश बाबूचा १००० कोटींचा चित्रपट भव्य! हतिक रोशनच्या चित्रपटाचा होता एक भाग

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी :** एसएस राजामौली चित्रपट बनवत असतील, तर त्याची चर्चा होणे स्वाभाविक आहे. त्याचा पुढचा चित्रपट डड्ब्इ२९ आहे. त्याचे बजेट सुमारे १००० कोटी रुपये असल्याचे सांगितले जाते. त्याला पॅन वर्ल्ड फिल्म म्हणून हाताळायचे आहे. महेश बाबू यात आधीच फायनल झाला आहे. याशिवाय अद्याप कोणत्याही अभिनेत्याचे नाव फायनल झालेले नाही. तथापि, काही नावे बाजारात ट्रेंड करत आहेत, आम्ही त्यांच्याबद्दल पुढे बोलू. तूर्तास त्याचे सिनेमॅटोग्राफर पी एस विनोद बद्दल बोलूया. सिनेजोशने दिलेल्या माहितीनुसार या चित्रपटासाठी सिनेमॅटोग्राफर पी एस विनोद यांना फायनल करण्यात आले आहे. मात्र, याबाबत अद्याप कोणतीही औपचारिक घोषणा करण्यात आलेली नाही. या चित्रपटाची घोषणा अद्याप झाली नसली, तरी याच्या बातम्या सध्या चर्चेत आहेत आणि राजामौली यांनीही याबद्दल बोलले आहे.

पान १ वरून...

### राज्यात पाऊस पुन्हा ॲक्टीव

पुढील ४८ तासांत मुसळधार पावसाची शक्यता

राज्यात पुढील ४८ तासांत पावसाचा जोर वाढणार असून मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. शुक्रवारपासून मध्य महाराष्ट्रासह मराठवाड्यात पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला असून त्यानंतर संपूर्ण विदर्भ मराठवाडा तसेच मध्य महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांना जोरदार पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे.

कोणत्या जिल्ह्यांना यलो अलर्ट?

शुक्रवार दि २० सप्टेंबर रोजी जळगाव जालना, परभणी, हिंगोली, नांदेड जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे.शनिवार दि २१ सप्टेंबर रोजी संपूर्ण विदर्भ, मराठवाड्याला यलो अलर्ट देण्यात आला असून मध्य महाराष्ट्रातील अहमदनगर, सोलापूर जिल्ह्यांमध्ये जोरदार पावसाचा यलो अलर्ट देण्यात आलाय.रविवारी दि २२ सप्टेंबर रोजी संपूर्ण विदर्भात पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. उर्वरित भागात पावसाचा जोर ओसरणार असल्याचा अंदाज आहे.

### आधी महापालिका निवडणुका घ्या

आज केंद्रीय मंत्रिमंडळाने मान्यता दिली. अर्थात ही फक्त केंद्रीय मंत्रिमंडळाची मान्यता आहे आणि अजून याला संसदेची मान्यता लागेल. आणि अर्थात देशातील प्रत्येक राज्याचा कौल पण विचारात घ्यावाच लागेल. आणि कौलचा अर्थ वरवरची मान्यता नाही तर अशा प्रकारांनी राज्यांच्या अधिकारांना, स्वायत्ततेला धक्का पोहचणार नाही, याची खातरजमा पण व्हायलाच हवी.

बरं जर एखाद्या राज्यात सरकार कोसळलं किंवा किंवा तिथली विधानसभा बरखास्त झाली तर तिकडे आधी निवडणूक होणार का ? त्या राज्याने लोकसभेचा कार्यकाळ संपेपर्यंत वाट पहायची? किंवा समजा काही कारणांनी लोकसभेच्या मध्यावधी निवडणुका लागल्या तर देशातील सगळ्या निवडणुका परत होणार का? असा कुठलाच खुलासा झालेला नाही. तो कदाचित होईल. असो...

पण 'एक देश एक निवडणूक' हे सर्व ठीक आहे, आधी राज्यातल्या महापालिका, नगरपालिकांच्या निवडणुका घ्या. येत्या ऑक्टोबर २०२४ मध्ये कित्येक महापालिकांमध्ये, नगरपालिकांमध्ये प्रशासक येऊन ४ वर्ष होतील. इतका काळ नगरसेवक नाहीत म्हणजे लोकप्रतिनिधी नाहीत. ते जास्त महत्वाचं नाही का? स्थानिक स्वराज्य संस्थांचा थेट संबंध सामान्य माणसांच्या जगण्याशी, त्यांच्या प्रश्नांशी असतो. त्याच्याच निवडणुका होत नसतील तर सामान्य माणसाने जायचं कोणाकडे?

निवडणुकांचं महत्व इतकंच वाटतंय तर या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लवकरात लवकर घ्या...

# लेबनॉनमध्ये पेजरद्वारे झाला मोठा स्फोट; पेजर म्हणजे नेमकं काय?

सध्या इस्राईल जवळ असलेल्या लेबनॉन येथे युद्ध होत आहे. ते युद्ध आता इलेक्ट्रॉनिक पद्धतीने व्हायला लागलेले आहे. अनेक शहरांमध्ये लोकांच्या खिशात असलेले पेजर अचानक रस्त्यात आणि बाजारात स्फोट लागलेले आहे. ठीक ठिकाणी या पेजर्समध्ये दहशतवादी संघटनेची जवळपास २७५० सदस्य जखमी झालेले आहेत. आतापर्यंत आठ लोक ठार झालेले आहे. पेजर हे माहितीची देवाण–घेवाण करणारे हे छोटेसे इलेक्ट्रॉनिक्स उपकरण आहे. अनेक लोकांच्या मृत्यूसाठी हे पेजर कसे काय कारणीभूत ठरत आहे? एवढा मोठा हल्ला कसा काय होत आहे? इलेक्ट्रॉनिक उपकरण मधून इतक्या लोकांना कशी काय बाधा होत आहे? या



सगळ्याची माहिती आज आपण जाणून घेणार आहोत.

**पेजर म्हणजे काय ?**

पेजर हे छोटेसे इलेक्ट्रॉनिक्स कम्युनिकेशन डिवाइस आहे. हे डिवाइस संदेश पाठवण्यासाठी वापरले जाते. ९० च्या दशकापर्यंत जगभरात पेजर मोठ्या प्रमाणात वापरले जात होते. परंतु हळूहळू मोबाईल आणि तंत्रज्ञानाचा शोध लागला. आणि पेजर वापरातून कमी झाले. परंतु अनेक दहशतवादी संघटना आणि गुन्हेगार पेजर वापरतात. या पेजवर स्क्रीनवर मेसेज दिसतो. तसेच एखाद्याचा क्रमांक देखील दिसतो. जेव्हा पेजवर मेसेज येतो तेव्हा व्हायब्रेशन जाणवते. किंवा बीप असते. त्याला बीपर असे म्हणतात. ज्यावेळी एखाद्या ठिकाणी शांतता बाळगणे गरजेचे असते. त्यावेळी पेजरचा वापर केला जातो.

**पेजर कसे काम करते ?**

पेजर हे मोबाईल जेव्हा इतर कम्युनिकेशन डिवाइस पेक्षा जास्त सुरक्षित मानले जाते. या पेजरद्वारे तुम्हाला जर एखाद्या व्यक्तीला मेसेज पाठवायचा असेल, तर तुम्हाला सगळ्यात आधी डिवाइसमध्ये त्या व्यक्तीची रेडिओ रिक्वेन्सी सेट करावी लागते. आणि त्यानंतरच तुम्ही संदेश पाठवू शकता. परंतु यावर कॉलिंगची सुविधा नाही.

**पेजरचे किती प्रकार पडतात ?**

पेजरचे एकूण तीन प्रकार पडतात. पहिले म्हणजे वनवे पेजर. यामध्ये फक्त तुम्हाला मेसेज मिळू शकतो. तुम्ही दुसऱ्याला मेसेज पाठवू शकत नाही. दुसरा म्हणजे टू वे पेजर. यामध्ये तुम्हाला एसएमएस पाठवण्याची आणि रिसिव्ह करण्याची सुविधा असेल. तिसरा म्हणजे व्हॉइस मेसेज. यामध्ये तुम्ही व्हॉइस रेकॉर्ड केलेले मेसेज पाठवू शकता.

**पेजरद्वारे स्फोट कसे झाले ?**

पेजरमध्ये स्फोटके आधीपासूनच असावी असा अंदाज अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. हेझबोलाने या हल्ल्यामागे इस्राईलचा हात असल्याचा संशय व्यक्त केलेला आहे. दहशतवादी वापरत असलेल्या पेजरमध्ये लिथियम बॅटरीचा वापर केला जात होता. या बॅटरीमध्ये स्पॉट झाला असण्याची शक्यता देखील वर्तवण्यात आलेली आहे. लिथियमची बॅटरी जर प्रमाणापेक्षा जास्त गरम झाली तर त्यातून धूर निघतो. त्यामुळे ही बॅटरी वितळण्याची आणि आग निर्माण होण्याची क्षमता निर्माण होते. तशाच प्रकारे बॅटरी तुमचा मोबाईल फोन, लॅपटॉप आणि इलेक्ट्रॉनिक्स वाहनात वापरल्या जातात. आणि या ५९० डिग्री सेल्सिअस पर्यंत जर तापल्या तर त्याला आग लागते.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### राहुल गांधी यांच्या बद्दल आ.संजय गायकवाड यांनी केलेल्या वक्तव्या विरोधात भीमशक्ती सेनेचे निषेध आंदोलन




दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** बुलढाणा विधानसभेचे आमदार संजय गायकवाड यांनी राहुल गांधी यांच्या बद्दल केलेल्या वक्तव्या विरोधात भीमशक्ती सेनेच्या वतीने क्रांतीचे पोलीस स्टेशन येथे आंदोलन करून निदर्शने करण्यात आली. असे द्वेष निर्माण करणारे वक्तव्य करणे म्हणजे जाणीवपूर्वक अराजकता निर्माण करणे अशा संविधानिक पदावर असलेल्या आमदारावर गुन्हा दाखल व्हावा, जनतेच्या भावना दुखावणारे व्यक्त करणाऱ्या विरोधात गुन्हा दाखल करावा यासाठी आज भीमशक्ती संघटनेच्या वतीने हे आंदोलन व निदर्शने करण्यात आली.

### लग्नपूर्व समुपदेशन काळाची गरज आहे - रुपाली चाकणकर




दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी :** लग्न झाल्यानंतर थोडया थोड्या गोष्टीतून भांडणे होऊन त्याचे रूपांतर घटस्फ़ोटात होते. घटस्फ़ोट होणे दोघांसाठीही क्लेशदायक असतो. हे टाळण्यासाठी लग्नपूर्व समुपदेशन होणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे असे समुपदेशन कक्ष जिल्हा स्तरावर होण्यासाठी आपले शासनस्तरावर प्रयत्न सुरु असल्याची माहिती राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी दिली.

जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांची आढावा बैठक जिल्हा नियोजन भवनच्या बैठक कक्षात आयोजित केली होती. त्यावेळी त्या बोलत होत्या. या बैठकीला जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित, जिल्हा पोलिस अधिक्षक डॉ. महेश्र्वर रेड्डी,महापालिका आयुक्त ज्ञानेश्र्वर ढेरे, निवासी उपजिल्हाधिकारी गजेंद्र पाटोळे, जिल्हा महिला व बाल कल्याण अधिकारी वनिता सोनगत, विविध विभागाचे प्रमुख यावेळी उपस्थित होते.

### पट्टणकोडोलीच्या प्रसिद्ध श्री विठ्ठल बिरदेव यात्रेचा कार्यक्रम जाहीर



दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या कोल्हापुरातील पट्टणकडोली येथील श्री विठ्ठल बिरदेव यात्रेचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. सोमवार २१ ऑक्टोबर २०२४ पासून यात्रेला प्रारंभ होत आहे. या दिवशी हेगडी बोते भक्त नैवेद्य, फरांडे बाबांची भाकणूक, पहिली आणि दुसरी पालखी असेल. मंगळवार २२ ऑक्टोबर रोजी भर यात्रा सार्वजनिक नैवेद्य, तिसरी आणि चौथी पालखी असेल. तर बुधवारी २३ ऑक्टोबर रोजी पाचवी पालखी आणि फूट यात्रा पार पडेल. ही यात्रा ठरवणेसाठी कर्नाटकतील संकेश्र्वर, बुदनूर, रायबागचे हेगडे, बोते आणि भक्त आले होते. पट्टण कोडोलीतील ग्रामपंचायतमध्ये हा यात्रा ठरवण्याचा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी देवस्थानकचे मानकरी पुरोहित जोशी, पाटील, मगदूम, चौगुले, कुलकर्णी, गावडे, पुजारी आदिसह धनगर समाज बांधव आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

### भारतीय रेल्वेने सुरू केली ‘स्वच्छता ही सेवा मोहीम’, २ ऑक्टोबरपर्यंत सुरू राहणार उपक्रम

**मुंबई/प्रतिनिधी :** मंगळवार १७ सप्टेंबर रोजी वी दिल्ली येथील रेल भवनच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये आयोजित समारंभात ‘स्वच्छता ही सेवा अभियान’ सुरू केले रेल्वे बोर्डाचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि अध्यक्ष सतीश कुमार यांच्या हस्ते या अभियानाला सुरुवात केली. कार्यक्रमादरम्यान कुमार यांनी रेल्वे कर्मचाऱ्यांना सांगितले की चॅम्पियन स्वच्छतेची शपथ. या वर्षी स्वच्छता ही सेवा मोहिमेची थीम ‘स्वभाव स्वच्छता – संस्कार स्वच्छता’ आहे. या मोहिमेचा समारोप २ ऑक्टोबर रोजी महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त ‘स्वच्छ भारत दिवस’ या कार्यक्रमाने होणार आहे.

कार्यक्रमादरम्यान, कुमार यांनी जीवनाच्या सर्व पैलूंमध्ये – घरे, कार्यस्थळे, समुदाय आणि संपूर्ण देशामध्ये स्वच्छता राखण्याच्या महत्त्वावर भर दिला. त्यांनी गांधींच्या व्यापक दृष्टीचे प्रतिबिंबित केले, ज्याने स्वच्छ आणि समृद्ध भारताचा समावेश करण्यासाठी राजकीय स्वातंत्र्याच्या पलीकडे जाऊन विचार केला.

# चांदवडच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवीच्या रंगमहालचे दुरस्तीचे काम मंद गतीने, त्यात लक्ष घालून जुन्या ठेव्याकडे लक्ष द्यावे

## आमदार बच्चु कडू यांचे पत्रकार परिषदेत आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** चांदवडच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा रंगमहालाचे दुरस्तीचे काम पुर्ण करण्यासाठी दहा ते पंधरा वर्षाचा कालावधी लागणार असेल तर उपयोग काय ? कारण या रंगमहालाचे काम मंद गतीने सुरु आहे. रंगमहाल बनविण्यासाठी अहिल्यादेवीने पाच वर्षात हा महाल बनविला मात्र पुरातन वास्तु विभागाने लक्ष घालून हे रंगमहालाचे काम गतीने व्हावे अशी अपेक्षा आमदार बच्चु कडू यांनी चांदवडच्या रंगमहालाच्या दुरस्तीच्या कामाची पाहणी केली असता त्यानंतर पत्रकार परिषदेत केली.

शासनकत्याची नकारात्मक भूमिका लक्षात येते या रंगमहालाच्या दुरस्तीसाठी समाधान बागल व गणोश निबांळकर यांनी सातत्याने पाठपूरावा करुन या कामाच्या दुरस्तीचे काम सुरु झाले. रंगमहाल व अहिल्यादेवी होळकराचे स्मारक व्हावे अशी अपेक्षा बच्चु कडू यांनी व्यक्त केली पाच कोटीच्या कामासाठी पाच वर्ष लागु नये अशी अपेक्षा बच्चु कडू यांनी व्यक्त केली. छत्रपती शिवाजी महाराज , शहाजी महाराज , पेशवे यांचा देशपातळीवर व जगपातळीवर इतिहास सर्वाना परिचित आहे. रंगमहाल आहे पण काम करतांना त्यांच्या जुन्या आठवणी पुसु नये त्यांची जुनी आठवण सर्वाना राहावी. अशी अपेक्षा बच्चु कडू यांनी व्यक्त केली.

पुरातन विभागाने यासाठी पंधरा ते वीस कोटीचा निधीचा नव्याने प्रस्ताव करुन शासनकडे पाठवावा त्याचा आम्ही प्रहार संघटनेतर्फे शासनाकडे पाठपुरावा करु असे यावेळी बच्चु कडू यांनी पत्रकार परिषदेत सांगीतले. चांदवड तालुक्यातील दुष्काळी परिस्थिती मध्ये शेतक:यांच्या मका पिकाबाबत नुकसानीबाबत विम्या संदर्भात कृषी अधिकारी शेतकऱ्यांच्या बाजुने अहवाल देण्यापेक्षा कंपनीच्या बाजुने अहवाल दिल्यामुळे विम्याचे पैसे मिळत नसल्याची तक्रार प्राप्त झाली असून त्यांनी शेतक:यांच्या बाजुने अहवाल द्यावा असेही कडू यांनी सांगतीले.



विधानसभेबाबत चांदवडची व निफाडची जागा प्रहार साठी सोडली असून अजुनही जिल्हयातील तीन ठिकाणी प्रहार मागणी करणार आहे. चांदवड तालुका हा सातत्याने दुष्काळाचा टिळा लागलेला आहे. यावर लोकसभा, विधानसभा निवडणुक आली की त्यावरच चर्चा होते यावर बच्चु कडू यांनी सांगितले. की, पंच्यातर वर्षे फसवणुकीचा इतिहास सुरु आहे. प्रहारचा आमदार झाल्यास मनापासून काम केले जाईल दुष्काळ व इतर प्रश्र्न सोडविले जातील. पुनेगाव कालव्याचे पाणी बंद केल्याची तक्रार केली असता याबाबत पाण्यासाठी राजकारण करु नये अशी सुचना कडू यांनी केली. चांदवड तालुक्यात पाण्यासाठी राजकारण करु नये, तर चांदवड तालुक्यात फक्त हाथीयाड धरणाबाबत निवडणुकाच्या तोंडावर चर्चा सुरु असून यावर प्रहारला सत्ता दिली तर हा प्रश्र्न चुटकीसरशी सोडवू असे त्यांनी सांगीतले.

यावेळी गणोश निंबाळकर, समाधान बागल, चांदवड नायब तहसीलदार खेडकर, रेणुका देवी संस्थानचे सहाय्यक व्यवस्थापक सुभाष पवार, पोलीस निरीक्षक कैलास वाघ व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. त्यांनी रंगमहालच्या कामाची पाहणी केली व चांगल्या दर्जाचे काम करावे अशी सुचना ठेकेदार यांना केले. यावेळी अहिल्यादेवी होळकरांचा इतिहास लासलगाव येथील पुरातन वास्तु संशोधक यांनी मांडला.

## सदाभाऊ खोत यांनी रोहित पवारावर जहरी टीकास्त्र करून केला पलटवार

दैनिक आपला विदर्भ

**सांगली/प्रतिनिधी :** महाराष्ट्रामध्ये गाव गाड्यांना संगत घेऊन विस्थापनांना घेऊन १८ पगड जाती बारा बलुतेदार आलूतेदार यांना बरोबर घेऊन जाण्याची क्षमता फक्त देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आहे. आणि त्यांचे दूरपल्याचे नेतृत्व आहे. देवेंद्र फडणवीस म्हणजे लंबी रेस का घोडा आहे. हे रोहित पवार यांच्या घराण्याला माहीत आहे. कारण पवार घराणे म्हणजे महाराष्ट्राचं राजकारण. सत्ता कारण स्वतः ची जहागिरी समजून आतापर्यंत राजकारण करत आलेली आहे. महाराष्ट्र काय आंधळा नाही. बहिरा नाही. तुमच्या घराण्यात



दोन दोन खासदार तीन तीन चार आमदार तुम्हाना संपूर्ण महाराष्ट्राची सत्ता पाहिजे आहे. देशाची सत्ता पाहिजे आहे. म्हणजे एवढी देशाची सेवा करण्याची तल्लभ का यावी याचे उत्तर तुम्हाला पहिल्यांदा द्यावे लागेल. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यामध्ये दऱ्या खोऱ्यामध्ये आमदार होण्यासाठी खासदार होण्यासाठी काय लेकरू बाळ जन्माला आलेली का नाय याचेही उत्तर खऱ्या अर्थाने रोहित पवारांनी दिले तर बरे होईल.

महाराष्ट्रामध्ये आंदोलन उभा करण्याचं काम त्या आंदोलनातून समाजाला काही का नाही मिळू देत पण आम्हास सत्ता मिळाली पाहिजे. प्रश्र्न सोडायला सरकार तयार असले तरी ते प्रश्र्न सुटता कामा नये अशा पद्धतीची व्यवस्थापना खऱ्या अर्थाने रोहित पवार आणि राष्ट्रवादी यांच्या पक्षाने केली आहे आणि म्हणून मराठा आरक्षण डब्ल्यू एस मधून मराठा आरक्षण मोदींनी दिले दहा टक्के आरक्षण शिंदेंनी दिले आमच्या सरकारने दिले. अनेक योजना दिल्या एवढं सगळं दिले असताना सुद्धा या महाराष्ट्रामध्ये रोहित पवार आणि कंपनी जाती-जातींमध्ये आग लावण्याचे काम करीत सुटलेले आहे.. खऱ्या अर्थाने याचे नामकरण भविष्यात आगलावे असेच होईल.




## ठाण्यातील नौपाडा पोलीस स्टेशनच्या गणरायाचे विसर्जन संपन्न

दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी :** ठाण्यातील नौपाडा पोलीस स्टेशनच्या वतीने, नेहमीप्रमाणे यंदाही गणरायाची स्थापना मोठ्या उत्साहात करण्यात आली. पोलीस स्टेशनमधील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी दहा दिवस गणरायाची भक्तिभावाने पूजा केली. विशेष म्हणजे, ड्युटीवर कार्यरत असलेल्या नौपाडा पोलिसांनी नेहमीप्रमाणे आपल्या बाप्पाचे विसर्जन अनंत चतुर्दशीच्या दुसऱ्या दिवशी, म्हणजेच आनंद चतुर्थीला, भक्तिमय वातावरणात पूर्ण केले.या वर्षीच्या मिरवणुकीत मोठ्या प्रमाणात बेंजो पथकांचा सहभाग दिसून आला. मिरवणुकीचे मुख्य आकर्षण पोलीस स्टेशनच्या कर्मचाऱ्यांचा आनंद आणि उत्साह होता, ज्यांनी आपल्या बाप्पाला निरोप देण्यासाठी जल्लोष केला. विसर्जनाच्या दिवशी पोलिसांनी आपली कर्तव्ये पार पाडत, विसर्जन सोहळा शिस्तबद्ध पद्धतीने पूर्ण केला. गणेशोत्सवाच्या दरम्यान, पोलीस स्टेशनने सुरक्षेच्या दृष्टीने विशेष बंदोबस्त ठेवला होता. विसर्जनाच्या सोहळ्यानंतर पोलिसांनी आपल्या नियमित कर्तव्यांवर परतताना एकमेकांचे अभिनंदन केले आणि गणरायाला पुढच्या वर्षी लवकर येण्याचे निमंत्रण दिले.

## नागरे महाविद्यालयाने राबविला गणपती विसर्जनानंतर स्वच्छतेचा उपक्रम

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**दुसरबीड :** स्थानिक दुसरबीड दि.१८ येथील नारायणराव नागरे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठांतर्गत राबविण्यात येणाऱ्या पंधरवड्यात स्वभाव स्वच्छता संस्कार स्वच्छता या उपक्रमात सुरुवात दिनांक १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२४ या कालावधीमध्ये स्वच्छतेचा उपक्रम राबविण्यात येणार असून दिनांक १८ सप्टेंबर पासून गणपती विसर्जन झाल्या ने रस्त्यांवरती पडलेला घनकचरा साफसफाई करण्याचं काम महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवकांनी केलेले आहे या उपक्रमामध्ये गावातील नागरिक व विद्यार्थ्यांनी बॅनर व फलक हातामध्ये घेऊन स्वभाव स्वच्छता संस्कार स्वच्छता हा संदेश देण्याचे कार्य विद्यार्थ्यांनी केले






या उपक्रमामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य तथा राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉक्टर विजय नागरे यांनी पुढाकार घेऊन हा कार्यक्रम महाविद्यालयातील विद्यार्थ्यांपासून ते परिसरातील खेड्यांमधील घराघरापर्यंत पोहोचण्याचा आव्हान केले आहे या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक डॉक्टर दीपक देशमाने डॉक्टर गणेश घुगे प्राध्यापक एस आर वाघ प्राध्यापक बी डी शिंदेह प्राध्यापक तारे प्राध्यापक प्राध्यापक मिलिंद गवई प्राध्यापक देवानंद नागरे प्राध्यापिकांना नयना गवारे प्राध्यापक महेश कायंदे प्राध्यापक शेख युनूस श्री अनिल गायकवाड श्री अनिल रानमले बीएस पांढरे श्री गजानन मुंडे इत्यादी उपस्थित होते

### गणेशोत्सव काळात पुणेकरांची मेट्रोला पसंती ; २० लाखांहून अधिक प्रवाशांनी केला प्रवास

**पुणे/प्रतिनिधी :** राज्यातील दुसरे महत्वाचे शहर म्हणजे पुणे. पुणे आता झपाट्याने विकसित होत आहे. देशाच्या वेगवेगळ्या भागातून नागरिक येथे शिक्षण आणि नोकरीच्या निमित्ताने येऊन वसले आहेत. त्यामुळे पुण्याच्या लोकसंख्येत वाढ झाली आहे. परिणामी पुण्याच्या वाहतुकीतही वाढ झाली आहे. त्यातही सार्वजनिक वाहतुकीमध्ये बस आणि मेट्रो हे दोन्ही घटक महत्वाची भूमिका बजावत आहेत. गणेश विसर्जनाच्या दिवशी देखील मेट्रोला चांगली प्रवासी संख्या मिळाल्याचे दिसून येत आहे.मिळालेल्या माहितीनुसार गणेश विसर्जनाच्या दिवशी, मंगळवारी (दि. १७) तब्बल तीन लाख ४६ हजार ६६३ प्रवाशांनी मेट्रोने प्रवास केला. ही प्रवासी संख्या मेट्रोची आजवरची सर्वाधिक प्रवासी संख्या आहे. विशेष गोष्ट म्हणजे यातून मेट्रोला ५४ लाख ९२ हजार ४१२ रुपये उत्पन्न मिळाले.पुण्यातील गणेशोत्सव अधिक लोकप्रिय आहे. गणेशोत्सव कालावधीत पुण्याच्या मध्यवर्ती भागात गणेश मंडळांचे देखावे पाहण्यासाठी राज्यभरातून भाविक आले. भाविक प्रवाशांची गैरसोय होऊ नये यासाठी मेट्रो कडून अधिक फेऱ्या सोडल्या. सात सप्टेंबर पासून १८ सप्टेंबर पर्यंत या फेऱ्या वाढविण्यात आल्या होत्या.

नियमित दिवशी मेट्रो सेवा रात्री दहा वाजता बंद होते. मात्र गणेशोत्सव कालावधीत ही सेवा वाढवली होती. सात ते नऊ सप्टेंबर या कालावधीत मेट्रो सकाळी सहा ते रात्री अकरा पर्यंत सुरू होती.


# डोणगाव येथे गणेश विसर्जन शांततेत

## २५ परवानाधारक गणेश मंडळांनी गणेश विसर्जन केले शांततेत

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** सर्वांच्या लाडक्या बाप्पाला दि.१७ सप्टेंबर रोजी भक्तिमय वातावरणात अनंत चतुर्दशीच्या दिवशी निरोप देण्यात आला. डोणगाव शहरी व ग्रामीण येथे एकूण २५ गणेश मंडळांनी परवानगी काढली होती. ढोल ताशाच्या निनादात करीत मिरवणूक शांततेत पार पडली. यावेळी ठाणेदार अमरनाथ नागरे यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. डोणगाव येथे एकूण १२ गणेश मंडळांनी नोंदणी केली होती. दि. ७ सप्टेंबर रोजी विघ्नहर्ता गणरायाची विधीवत पूजा करून स्थापना केली. गणेशोत्सव काळात विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रम घेण्यात आले.

अनेक मंडळांनी सामाजिक संदेश देत जनजागृती करून नागरिकांचे लक्ष वेधले. गणेशोत्सव काळ हा भक्तीमय







वातावरणाने फुलून गेला होता. सर्वांचे लाकडे असलेल्या बाप्पाला अनंत चतुर्दशीला दि. १७ सप्टेंबर रोजी निरोप देण्यात आला.

गणेश मंडळाच्या वतीने काढण्यात आलेल्या गणेश विसर्जन मिरवणुकीत शांततेत व उत्साहात बाप्पाचे विसर्जन करण्यात आले. ढोल ताशांच्या आवाजाने डोणगाव दणाणून गेले होते. लाडक्या बाप्पाला निरोप देण्यासाठी गणपती बाप्पा मोरया...

पुढच्या वर्षी लवकर अशा घोषणा देत गणरायाला निरोप देण्यात आला. कुठलाही अनुचित प्रकार न घडता गणेश विसर्जन मिरवणूक अतिशय शांततेत पार पडली.मिरवणूक शांततेत पार पडावी यासाठी ठाणेदार अमरनाथ नागरे यांच्या मार्गदर्शनात पोलिस बंदोबस्त चौख ठेवण्यात आला होता. ठाणेदार अमरनाथ नागरे हे स्वतः उपस्थित राहून सर्व गणेश मंडळ यांना कुठेही त्रास होऊ नये याची काळजी घेतली...

## विविध वृत्त...

### शहरातील पाणी कपात बंद, आता १ दिवसाआड पाणी पुरवठा ; डॉ विजयकुमार गावित यांची माहिती



दैनिक आपला विदर्भ

**नंदूरबार/प्रतिनिधी** : नंदुरबार शहराला २५ सप्टेंबर पासून एक दिवसाआड पाणीपुरवठा होणार असल्याची माहिती राज्याचे आदिवासी विकास मंत्री तथा नंदुरबार विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ. विजयकुमार गावित यांनी दिली आहे. नंदुरबार शहराला मागील काही महिन्यात पाणीटंचाईची छळ पोहोचली होती. उन्हाळ्यात पाण्याची पातळी घटल्यामुळे नगर पालिका प्रशासनातर्फे पाणी कपात करण्यात येऊन पाणी चार दिवसा नंतर द्यावे लागत होते. यावर्षी चांगला व समाधानकारक पाऊस झाल्यामुळे नंदुरबार शहराला पाणीपुरवठा करणारे धरणे पूर्ण क्षमतेने भरले आहे त्यामुळे पाण्याची टंचाईचे सावट आता दूर झाले आहे. त्यामुळे नंदुरबार शहराला पाणीटंचाईची झळ बसू नये व नंदुरबार शहरातील नागरिकांना मुबलक शुद्ध पाणीसाठा मिळावा यासाठी नंदुरबार नगरपालिकेला आदेश देण्यात आले आहे त्यामुळे आता नंदुरबार नगरपालिका हद्दीतील नागरिकांची पाण्याचे समस्या दूर झाली आहे. २५ सप्टेंबर पासून शहरातील नागरिकांना एक दिवसाआड पाणीपुरवठा होईल असे डॉ विजयकुमार गावित यांनी सांगितले.

### डोणगाव येथे महाप्रसादाचे वितरण श्री शिवाजी हायस्कूलचा अनोखा उपक्रम



दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी** : येथील श्री शिवाजी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने आज दिनांक १८ सप्टेंबर २०२४ रोजी गणेश विसर्जनानिमित्त महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले.या महाप्रसादाचा शेकडो भाविकांनी लाभ घेतला. सर्व शिक्षकांच्या वतीने विद्यार्थ्यांना महाप्रसाद वाटप करण्यात आले. कोणताही व्यर्थ खर्च न करता श्री शिवाजी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय यांनी पुन्हा एक अनोखा कार्यक्रम करून दिला सामाजिक संदेश. श्री शिवाजी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयचे अध्यक्ष राजेंद्र आखाडे यांच्या मार्गदर्शनात नेहमीच शाळेच्या वतीने सामाजिक दृष्टिकोनातून एक चांगला संदेश देण्याचे काम केले जात असते व विद्यार्थ्यांना त्यापासून फायदा कसा होईल या दृष्टिकोनातून हे उपक्रम राबवण्यात येतात. बाप्पाचे विसर्जन अतिशय शांततेत करून कुठलाही व्यर्थ खर्च न करता विद्यार्थ्यांना महाप्रसादाचे वितरण करून एक अनोखा सामाजिक संदेश शाळेच्या वतीने देण्यात आला यावेळेस प्राचार्य आखाडे सर व विद्यालयातील संपूर्ण शिक्षक वृंद शिक्षिका उपस्थित होत्या..

### यवतमाळ येथे लाडक्या बाप्पाला निरोप; अनंत चतुर्दशीच्या दिवशी घरगुती गणपतीचे विसर्जन



दैनिक आपला विदर्भ

■ आयाज काजी

**यवतमाळ :** गेल्या दहा दिवसांपासून घरगुती घरी विराजमान असलेल्या बापाला मंगळवार दि.१७ सप्टेंबर रोजी गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या अशी विनवणी करीत मोठ्यासह लहानग्यांनी बापाला भावपूर्ण वातावरणात निरोप दिला. ७ सप्टेंबर रोजी गणेश चतुर्थीच्या दिवशी मंडळासह घरोघरी गणपती बाप्पाचे आगमन झाले होते. अशातच यवतमाळ शहरात अनेक नागरिकांच्या घरी गणपतीची स्थापना करण्यात आली.

दररोज वेगवेगळे कार्यक्रमाने शहरासह जिल्ह्यात भक्तीमय वातावरण होते. अशातच गणेश भक्तांनी अतिशय उत्साहात व भक्तिमय वातावरणात बाप्पाची पूजा अर्चना केली. यवतमाळ शहरात दहाव्या दिवशी व अकरावा दिवस म्हणजेच अनंत चतुर्थीच्या दिवशी लाडक्या बापाला निरोप देण्यात आला. गणपती बाप्पा लवकर या... अशी साद घालत यवतमाळकरांकडून बाप्पाला भावपूर्ण निरोप देण्यात आला.

# डोणगाव येथील पोलिसाच्या त्रासाला कंटाळून युवकाचा आत्महत्या करण्याचा प्रयत्न

## पोलिस अधीक्षकांना दोन वेळा तक्रार करूनही दखल नाही

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी** :

डोणगाव पोलिस स्टेशन येथील कार्यरत असलेले एएसआय गाढवे आणि पो. हे कॉ. सतीश मुळे हे त्रास देऊन खोट्या गुन्ह्यात अडकविण्याच्या धमक्या देत आहेत.त्यामुळे त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी दोन वेळा पोलिस अधीक्षक यांना निवेदनाद्वारे तक्रार करूनही तक्रारीची दखल न घेतल्याने डोणगाव येथील बिलाल शाह मोहसीन शहा यांनी पोलिसांचा त्रासाला कंटाळून युवकाने बुलढाणा जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर दि.१८ सप्टेंबर रोजी आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. या घटनेमुळे सर्वत्र खळबळ उडाली आहे. पोलिसांनी वेळीच सदर तरुणाला ताब्यात घेतल्याने पुढील अनर्थ टळला.

घटनेबाबत मिळालेल्या माहितीनुसार बिलाल शाह मोहसीन शहा या युवकाने







डोणगाव पोलीस स्टेशनमध्ये कार्यरत असणारे एएसआय गाढवे व पोलीस हेड कॉन्स्टेबल सतीश मुळे हा खोट्या गुन्ह्यात अडकवण्याची धमकी व खंडणीची मागणी करीत असल्याची तक्रार १९ सप्टेंबर २०२४ व १३ सप्टेंबर २०२४ अशी दोन वेळा दिली होती की, १५ जुलै २०२४ रोजी डोणगांव पो.स्टे ला बोलवुन ०४/०५/२०२४ रोजीच्या दाखल झालेल्या गुन्ह्यावरून ताब्यात घेतले व कोणतेही कारण नसता एएसआय गाढवे यांनी धक्के देत मध्ये नेले व तेथे नेऊन माझे डाव्या हाताचे बोट पिगाळले त्यामुळे माझे बोट फॉकचर झाले व माझ्या पोटात एएसआय गाढवे यांनी लात मारली व शिव्या देत ३२६ दाखल करा असे म्हणत पो.ह.कॉ सतीश मुळे यांनी माझ्या वर दोन महिण्या नंतर कलम ३२६ ची केस दाखल केली आणि तु जर हे कोर्टात किंवा दुसर्या कोणा जवळ सांगितले तर तुला मोठ्या गुन्हात अटकऊ आणि तुझ जग्न मुस्कील करू अशी धमकी दिली. तसेच सतिष मुळे डोणगांव बीट पोलीस स्टेशन डोणगांव ता. मेहकर जि. बुलढाणा. येथे कार्यरत असुन त्यांच्या बीटमध्ये अवैध धंदे अवैधपणे रेती चालू...मागील २ महिने आधी एका ३२६ च्या गुन्ह्यात अटक करत नाही म्हणुन

> बिलाल शहा यांचे वर डोणगाव पोलिस स्टेशन मध्ये अप क्रं ११२/२४ कलम ३२४,३२४,३४ IPC प्रमाणे गुन्हा नोंद आहे त्यात आरोपीस अटक करुन लिं व ाली करण्यात आला होता.त्याचा एक साथीदार याने अटकपूर्व जमीन मिळविला होता आरोपी बिलाल शाह यांना प्रतिबंधक कार्यवाही केल्याने त्यांनी पोलिसावर दबाव आणण्यासाठी हा स्टंट केला आहे.असल्याचे पोलीस हेडकॉन्स्टेबल सतीश मुळे यांनी सांगितले.

### आत्महत्या करण्याचा प्रयत्न..

डोणगाव येथील बिलाल शहा यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या दालनात आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलीस प्रशासनाच्या सतर्कतेमुळे मोठा अनर्थ कळला याप्रसंगी बिलाल शहा त्यांच्यावर सुद्धा गुन्हा नोंद केल्याची माहिती मिळत आहे.

१ लाख रुपयेची मागणी केली. त्यांनी मला खंडणी मागितली व मला ३५३ सारख्या मोठ्या गुन्ह्यात अडकवून जेलमध्ये टाकतो, तसेच अट्रासिटि सुध्दा करतो, व माझ्या गाडीला टायर टाकुन अशा धमक्या देत सतत माझ्या घरी येवुन महिलांना धमक्या देत आहे. माझी लेखी तक्रार मागे घ्या अन्यथा तुमच्या पोराला जगन मुश्किल करतो. त्यांच संपुर्ण करीयर संपवुन टाकतो. जेलमध्ये सडवतो अशा धमक्या पो.हे.कॉ. सतिष मुळे देत मला मानसिक त्रास देत आहे. त्यामुळे त्यांच्यावर खंडणीचा गुन्हा दाखल करुन बडतर्फची कार्यवाही करावी. अन्यथा आत्मदहन करण्यात येईल असा इशारा वरिष्ठांना वारंवार तक्रार अर्जा निवेदनाद्वारे दिल्यानंतरही कार्यवाही झाली नाही. सदर कर्मचायांला सर्व वरीष्ठ अधिकारी वाचविण्याचा प्रयत करत असल्याने डोणगाव येथील बिलाल शहा, मोहसिन शहा यांनी आज दि.१८ सप्टेंबर रोजी बुलढाणा पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांच्या सतर्कतेमुळे पुढील अनर्थ टळला.आता या प्रकरणी वरिष्ठ काय कारवाई करतात. किंवा हे प्रकरण आणखी कुठलं वेगळं वळण घेते का हेही तेवढेच महत्त्वाचं ठरणार आहे.

## प्रबोधनकार ठाकरे हे मराठी जणांचा स्वाभीमान चेतवणारे थोर समाजसुधारक- गुणवंत मिसलवाड

**नांदेड/प्रतिनिधी** : मी मरेन तर महाराष्ट्रासाठी, मी जगेन तर महाराष्ट्रासाठीच अशी गर्जना करुन मराठी जनांचा स्वाभीमान चेतवण्यासाठी संपूर्ण आयुष्य वेचणारे थोर समाजसुधारक म्हणजे प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे हे होत असे प्रतिपादन एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते मा.श्री. गुणवंत एच. मिसलवाड यांनी केले. ते महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी डेपो) नांदेड आगार येथे दि. १७ सप्टेंबर २०२४ मंगळवार रोजी सकाळी ठिक १०.३० वाजता इतिहास संशोधक, मराठी पत्रकार, संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे नेते, थोर समाजसुधारक प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे यांच्या १३९ व्या जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या अभिवादन सोहळा कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते.

पुढे बोलताना ते आपल्या भाषणात म्हणाले की, शिक्षणसम्राट महात्मा जोतीराव फुले यांच्या क्रांतीकारी साहित्यांचा त्यांनी अभ्यास करुन बालविवाहाला विरोध, विधवांचा प्रश्न, अस्पृश्यतेचा प्रश्न, हुंडाप्रथेचा प्रश्न असो या सर्व सामाजिक प्रश्नांवर आपल्या ८८ वर्षाच्या आयुष्यात अखेरपर्यंत वर्कृत्व, लेखन व प्रत्यक्ष कृती या तीन शस्त्रांचा वापर करुन सामाजिक लढा दिला. अशा या महान व्यक्तीमत्त्वाचा तुम्ही- आम्ही सर्वचजण आदर्श घेऊन समाजाप्रती, देशाप्रती कार्य करण्याची ही काळाची गरज असल्याचेही ते यावेळी म्हणाले.

सर्वप्रथम आगार व्यवस्थापक अनिकेत बल्लाळ यांच्या हस्ते प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे यांच्या प्रतिमेचे पूजन करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून आगार व्यवस्थापक अनिकेत बल्लाळ, बसस्थानक प्रमुख यासीन हमीद खान, सहाय्यक कार्यशाळा अधीक्षक विष्णू हारकळ, श्रीनिवास रेणके, आगार लेखाकार सतीश गुंजकर, एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते गुणवंत एच. मिसलवाड, वाहतुक नियंत्रक बालाजी शिंदे, वरिष्ठ लिपीक गुलाम रब्बानी, गोविंद तेलंग, सौ. सुनीता हुंबे, रेखा माचीनवार, मनिषा कदम, संदीप देशमुख, संजय मंगनाळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

## सावलीत मराठवाडा मुक्ती संग्राम दिन रक्तदानाने संपन्न

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बीड** : बीड जिल्ह्यातील पाटोदा तालुक्यातील सावली फाउंडेशन द्वारा संचलित पार्श्र्व गो संगोपन प्रकल्पात मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त ध्वजारोहण करण्यात आले. आपला भारत देश हा कृषिप्रधान देश आहे आणि या देशात जो राबराब कष्ट करतो राबतो अशा शेतकरी बांधव श्री.चंद्रकांत काळुसे यांच्या शुभ हस्ते सदरील ध्वजारोहण करण्यात आले.त्यानंतर मराठवाडा मुक्ती संग्रामातील हुतात्म्यांना सावली फाउंडेशन च्या वतीने अकरा रक्तदात्यांनी रक्तदान करून आदरांजली अर्पण केली.



यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेले सावली फाउंडेशनचे संचालक श्री. दिपक गर्जे यांनी सांगितले की मी समाजात जन्मलो आणि समाजाचे काही देणे लागतो या हेतूने रक्ताची आवश्यकता असलेल्या गरजूंना सावली फाउंडेशन रक्त पुरवण्याचे कार्य करणार असल्याची माहिती उपस्थितांना दिली. यावेळी ज्ञानोबा गर्जे ,भाऊसाहेब गर्जे,कृष्णा जाधव,जिल्हा रुग्णालय बीडचे ओमकार भालेराव,बिभीषण म्हात्रे, संतोष गायकवाड, उत्तम राऊत, सतीश गायकवाड, सावली फाउंडेशन व अधिपती अर्बनचे सहकारी यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

## महिला सशक्तिकरण कार्यक्रमाकरिता येणाऱ्या वाहनाकरिता पार्किंग व्यवस्था

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : मुख्यमंत्री महिला सशक्तिकरण अभियानांतर्गत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा प्रचार व प्रसार कार्यक्रम व शहरातील विविध विकासकामांचा लोकार्पण सोहळा दि.१९ सप्टेंबर रोजी शारदा ज्ञानपीठ हायस्कूल येथे होत आहे. कार्यक्रमाकरिता तालुका स्तरावरुन येणाऱ्या बसेस, खाजगी वाहने व शासकीय अधिकारी,कर्मचारी यांचे वाहनांची पार्किंगची व्यवस्था खालील प्रमाणे करण्यात आली आहे.

### एस.टी. बसेसची पार्किंग व्यवस्था

चिखली, मेहकर, लोणार, सिंदखेडराजा, देऊळगांवराजा, खामगांव, शेगांव तालुक्यातील वाहनांसाठी पार्किंग डी.एड. महाविद्यालय सर्क्युलर रोड लगतचे मैदान,त्रिशरण चौक बुलढाणा येथे. बुलडाणा, मोताळा, मलकापुर, नांदुरा, जळगांव जामोद, संग्रामपुर तालुक्यातील वाहनांसाठी जिजामाता महाविद्यालय मैदान, बुलडाणा.

### खाजगी वाहनाकरिता पार्किंग व्यवस्था

बुलढाणा, चिखली, मेहकर, लोणार, सिंदखेडराजा, देऊळगाव राजा, खामगांव, शेगांव तालुक्यातील वाहनासाठी डी.एड महाविद्यालयाचे, देवीचे मंदीर बाजुचे मैदान येथे तर मोताळा, मलकापूर, नांदुरा, जळगांव जामोद, संग्रामपुर तालुक्यातील वाहनासाठी आयटीआय कॉलेजच्या बाजुकडील प्रांगणात येथे करण्यात आली आहे.

# २६ सप्टेंबरला बंजारा समाजाची काशी पोहरादेवी येथे नंगारा म्युझियम सोहळा

## मेहकर येथे राज्याचे कॅबिनेट मंत्री मा.ना. संजय भाऊ राठोड यांच्या उपस्थितीत आढावा सभा संपन्न

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी** : बंजारा समाजाची काशी असलेल्या पोहरादेवी येथे उभारण्यात आलेल्या म्युझियमचे व श्री.संत सेवालाल महाराज यांचे सुरु असलेले मंदिराचे उद्घाटन देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याहस्ते दि.२६ सप्टेंबर रोजी होणार आहे. या संदर्भात बुलढाणा जिल्ह्यातील सर्व बंजारा समाज बांधव व पश्र्चिम विदर्भाची आढावा बैठक दि.१६ सप्टेंबर रोजी महाराष्ट्र राज्याचे बंजारा समाजाचे लोकप्रिय नेते तथा कॅबिनेट मंत्री संजय राठोड यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली मेहकर येथील कृषी वैभव लॉन येथे संपन्न झाली. या कार्यक्रमाला समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन यावेळी राज्याचे कॅबिनेट मंत्री संजय राठोड यांनी केले.





महाराष्ट्रातील बंजारा समाजाचे लोकप्रिय नेते तथा कॅबिनेट मंत्री मा.ना. संजय भाऊ राठोड यांच्या नेतृत्वाखाली बंजारा समाजाचे आंतरराष्ट्रीय स्तरावरील नंगारा म्युझियमचे लोकार्पण सोहळा व श्री.संत सेवालाल महाराज यांचे सुरु असलेले मंदिराचे उद्घाटन देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याहस्ते दि.२६ सप्टेंबर रोजी होणार आहे. यावेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री अजित पवार व महाराष्ट्र शासनातील अनेक मंत्री या सोहळ्याला उपस्थित राहणार आहेत.

भारतातील इतर राज्यातून सुद्धा अनेक राजकीय व प्रशासकीय क्षेत्रातील दिग्गज या ठिकाणी उपस्थित राहणार आहेत. या सोहळ्याला देशातून जवळपास १५ लाखापेक्षा अधिक बंजारा समाजबांधव उपस्थित राहणार असल्याचे अंदाज आहे.

तरी या संदर्भात पश्र्चिम विदर्भात आढावा बैठक घेण्यासाठी काल महाराष्ट्र राज्याचे बंजारा समाजाचे लोकप्रिय नेते तथा कॅबिनेट मंत्री संजय राठोड यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली मेहकर येथील कृषी वैभव लॉन येथे बुलढाणा जिल्ह्यातील सर्व बंजारा समाज बांधवांची आढावा सभा संपन्न झाली. या आढावा सभेत सर्व बंजारा समाज बांधवांशी संवाद साधताना ना. संजय राठोड यांनी पोहरादेवी येथे नंगारा म्युझियम लोकार्पण सोहळ्याला हजारोंच्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले.

तसेच समाजाच्या विकासासाठी अविरत प्रयत्न करत राहणार असल्याचे निर्धार याप्रसंगी व्यक्त केला. बुलढाणा जिल्ह्यातून आलेल्या सर्व बंजारा समाज बांधवांनी महाराष्ट्रातील त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल यथोचित गौरव केला. यावेळी बंजारा समाजाच्या पारंपारिक वेशभूषेतील महिलांद्वारे भाऊंचे विशेष स्वागत करण्यात आले.

यावेळी राजगड संस्थांचे महंत रायसिंग महाराज, टेंबुरखेड संस्थांचे महंत हिम्मत महाराज, देऊळगाव साखरशा संस्थांचे महंत रामदास महाराज, श्री संत भानुदास महाराज संस्थान मोहनाचे विश्वस्त जानकिराम महाराज, समाज कल्याण सभापती अभय चव्हाण, मंत्री मृद व जलसंधारण खाजगी सचिव डॉ. विशाल राठोड, सेवानिवृत्त पोलीस अधीक्षक परसराम राठोड, बुलढाणा जिल्हा तांडा सुधार समिती अशासकीय सदस्य डॉ. प्रशांत राठोड, डॉ. अनिल राठोड, जि.प.सदस्य तेजराव जाधव,राम राठोड, मा. उपसभापती नारायण राठोड, मा.उपसभापती जगाराव आडे, सुरेश आडे, मोतीचंद राठोड, शेषराव राठोड, विजय चव्हाण, प्रकाश राठोड, विनोद राठोड, हिरासिंग जाधव, नवल चव्हाण, संपादक अंकुश राठोड, स्वीय सहाय्यक सचिन चव्हाण, स्वीय सहाय्यक निलेश जाधव, जनसंपर्क अधिकारी स्वप्नील राठोड तसेच अनेक तांड्यातील सरपंच नायक व कारभारी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या उत्कृष्ट आयोजनासाठी मृद व जलसंधारण मंत्री स्वीय सहाय्यक सुरेश चव्हाण, मृद व जलसंधारण मंत्री स्वीय सहाय्यक भारत राठोड, संपादक अंकुश राठोड, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता संतोष चव्हाण,वनविभागाचे देवराव पवार, पत्रकार विजय चव्हाण व बंजारा समाजबांधवानी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरेश चव्हाण यांनी केले. तर आभार संतोष चव्हाण यांनी मानले.